**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 387 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 24 / 10 / 2024

## 1)चोरी :–

**अर्धापूर :–** दिनांक 22.10.2024 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात मौजे अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. मुज्जमील खान इसा खान 2. ताज्जुमूल खान इसा खान रा. बडी दर्गा अर्धापूर 3. ट्रॅक्टर चालक शेख मजीद शेख अब्बास रा. सुभानी दर्गा अर्धापूर यांनी संगणमत करून ट्रॅक्टर क्रंमाक एम.एच.–24 / बीएल–8291 मध्ये फिर्यादीने काढून ठेवलेले सोयाबीन चोरून घेवून गेले, फिर्यादीने आरोपीस सोयाबीन चोरून घेवून जाता का असे विचारले असता आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ केली व पोलीस केस केलास तर तुला मारून टाकतो म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अता खान पि. इसा खान, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. मुल्लागल्ली अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 562 / 2024 कलम 303(2),351(2),352,3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 777 आडे, मो.नं. 7020105812** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**धर्माबाद :–**दिनांक 23.10.2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **रत्नाळी शिवार ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. नरहरी लक्ष्मण चव्हाण 2. विनोद बोईनवाड 3. पिराजी चव्हाण 4. देवराव लक्ष्मण वैनवाट रा. धर्माबाद व इतर 30 ते 35 आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीचे मालकी हक्काच्या शेतात बेकायदेशिर कब्जा करून फिर्यादी त्या जमिनीवर गेला असता आरोपीतांनी हातातील काठीने, सब्बलने व गिट्टीने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करून गंभीर जखमी केले तसेच शेतातील कापूस चोरून नेवून पिक नष्ट केले व गाडीची काच फोडून नूकसान करून शिवीगाळ केली. वगैरे **फिर्यादी अनमोल महेंद्रकुमार पांडे, वय 27 वर्षे, व्यवसाय व्यापार व चार्टर्ड अकाउंटंट रा. बालाजी गल्ली, धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 298 / 2024 कलम 118(2),118(1),189(2), 190,324(4),190(2),191(2),191(3),352,351(2),351(3),303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि / श्री रोकडे, मो.नं. 8329775627** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**भाग्यनगर :–** दिनांक 28.01.2020 रोजी 11.00 वा. ते दिनांक 24.09.2024 रोजी 10.30 वा. पावेतो, **फिर्यादीचे सासरी गाडीपूरा नांदेड व माहेरी पिरबुऱ्हाण नगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी पती नामे मोहम्मद वाजीद मोहम्मद हमीद व इतर पाच सर्व रा. गाडीपूरा नांदेड यांनी संगणमत करून फिर्यादी बाईस माहेरहुन गॅरेज टाकण्यासाठी 1,70,000 /–रूपये घेवुन ये म्हणुन थापड बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व तिचा शारिरीक व माणसीक छळ केला तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 526 / 2024 कलम 85,115(2),352,351(2),3(5) भा.न्या.सं–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोहेकॉ / 2525 केळगेंद्रे, मो.क्रं. 9657721311** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**विमानतळ :–** दिनांक 22.10.2024 रोजी 14.00 वा. सुमारास, **रॉयल रोज फंक्शन हॉलचे रोडवर अंजुम बेकरी दुकानाचे समोर आसरानगर, नांदेड येथे,** यातील **मयत नामे शेख अरिश शेख अजीम, वय 04 वर्ष रा. मोहमदीया कॉलनी, नांदेड** हा रोड क्रॉस करत असताना त्याला पाठीमागून येणारे रेतीने भरलेले वाहन टीप्पर ट्रक क्रंमाक एमएच–04 / जीआर–6226 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयताचे डोक्यावरून ट्रकचे टायर गेल्याने यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी शेख रहीम शेख मिया, वय 50 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. दानीश फंक्शन हॉलचे पाठीमागे मोहमदीया कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 432 / 2024 कलम 106(1),281 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री जोंधळे, मो.नं. 9175324824** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**इतवारा :–**दिनांक 22.10.2024 रोजी 23.00 वा. चे सुमारास, शिवनगर येथील **सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे सय्यद मोहसिन सय्यद कासीम, वय 28 वर्षे, रा. दुल्लेशाह रहेमाननगर, खडकपूरा नांदेड याने विना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात धारदार लोखंडी खंजर स्वतःचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी** परि. **पोउपनि/श्री विलास धोंडीराम पवार, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 388/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1988 मानेकर, मो.क्रं.** 9767002111 हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)बिलोली :–** दिनांक 23.10.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **बामणी बिअर शॉपी चे समोर रोडवर ता. बिलोली जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे गणेश पिराजी बुजुलवार, वय 24 वर्षे, व्यवसाय शेती रा. बामणी ता. बिलोली जि. नांदेड यांने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2240/–रूपयाचा माल होंडा शाईन मोटार सायकल क्रंमाक एमएच–26/सीएल–8846 किंमती 60,000/–रूपयाची वर चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करत असताना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3381 साईनाथ दत्तराम होकर्णे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 294/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1963 गुडमलवार, मो.नं. 8421453868** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 23.10.2024 रोजी 13.00 वा. चे सुमारास, **शांतीनगर येथील सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे** यातील आरोपी नामे राजु प्रकाश वाघमारे, वय 26 वर्षे, व्यवसाय बेकार रा. शांतीनगर, नांदेड यांने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2528 मधुकर शंकरराव भिसे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 390/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1204 दुरानी, मो.नं. 9823394360** हे करीत आहेत.

**3)भोकर :–** दिनांक 23.10.2024 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **निवगा कडून येणारे रोडने भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1. भुमेश खंडु जिकंलवाड 2. शाम मारोती पवार, दोघे रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी किंमती 6750/–रूपयाचा माल अॅल्टो कार क्रंमाक एमएच–26/एल–2955 किंमती 1,00,000/–रूपयाची मध्ये चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करत असताना ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1692 राजेश्वर विश्वांबर गुंडेवार, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 408/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2078 लक्षटवार, मो.नं. 9767114720** हे करीत आहेत.

**4)मरखेल :–** दिनांक 23.10.2024 रोजी 16.35 वा. चे सुमारास, **मौजे शिळवणी रोडवर ता. देगलूर जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1. हणमंत रामाकासले वय 25 वर्षे व्यवसाय मजुरी, 2. अजय दिगंबर म्हैत्रे, वय 22 वर्षे, व्यवसाय मजुरी दोघे रा. शिळवणी ता. देगलूर जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रूपयाचा माल मोटार सायकल क्रंमाक एमएच–26/एजे–1711 किंमती 25,000/–रूपयाची वर चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करत असताना ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3206 चंद्रकांत बाबुराव पांढरे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 235/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2414 पाटील, मो.नं. 9421761460** हे करीत आहेत.

## 7)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**1)कंधार :–**दिनांक 22.10.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **संभाजी बुरगुलवाड यांचे शेतात मौजे पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शंकर विठ्ठल काचबोईनवाड, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. कल्लाळी ता. कंधार जि. नांदेड** हा नमुद ठिकाणी शेतात विहिरीवरील पाण्याची विद्युत मोटारचे स्टार्टर चालू करीत असताना त्यास विद्युत शॉक लागून मरण पावला. वगैरे **खबर देणार सदाशिव विठ्ठल काचबोईनवाड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. कल्लाळी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **60/2024** कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गिते, मो.नं. 8767032593** हे करीत आहेत.

**2)उस्माननगर :–**दिनांक 22.10.2024 रोजी 03.10 वा. चे सुमारास, **मौजे भुत्याचीवाडी शेत शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दिपक बापूराव भुते, वय 23 वर्षे, व्यवसाय शेती रा. भुत्याचीवाडी ता. कंधार जि. नांदेड** याने खंडाने केलेल्या शेतामध्ये काम करीत असताना अचानक विजेचा तार तुटून त्याचे हातावर पडून त्याला विद्युत शॉक लागल्याने उपचार कामी स.द. विष्णुपूरी नांदेड येथे शरीक केले असता उपचारा दरमयान मरण पावला. वगैरे **खबर देणार ज्ञानेश्वर बापूराव भुते, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. भुत्याचीवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **24/2024** कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/851 कुबडे, मो.नं. 7774845851** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड